# व्यापाऱ्यांमुळे बाजार समिती अडचणीत

## दोन व्यापाऱ्यांचा शेतमाल थांबवण्याचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद, दि.८ :** शेतकरी हिताच्या गोष्टी करून राजीनामे देणारे माजी व्यापारी संचालकांनी बाजार समिती बंद पाडण्याचा डाव रचला आहे. बाजार समितीच्या दोन्ही व्यापाऱ्याने २३ लाख रुपये थकवले. यामुळे बाजार समिती आर्थिक संकटात सापडली. त्या दोघांमुळे बाजार समिती बंद पडली होती. त्या दोन्ही व्यापाऱ्यांवर बाजार समितीने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.



बाजार समितीचे व्यापारी संतोष कऱ्हाळे यांनी १३ लाख २२ हजार ७९५ रूपयांचा, तर विजय भांगडे यांनी ९ लाख ६४ हजार ८७३ रुपयाचा धनादेश दिला होता. दोघेही बाजार समितीचे माजी संचालक व व्यापारी असून बाजार समितीला २२ लाख ८७ हजार ६६८ रुपयांचा धनादेश दिला होता. त्यापैकी संतोष कऱ्हाळे यांनी दिलेला धनादेश बँकेत वटवला असता तो अनादरीत झाला. त्यामुळे बाजार समितीने त्यांचा माल थांबण्याचे आदेश दिले आहे. येथील बाजार समिती २ जानेवारीपासून सुरळीत सुरू आहे. बेकायदेशीरित्या अडत वसुली करणाऱ्यांवर बाजार समिती कायदेशीर कारवाई करणार आहे. अडते व व्यापारी शेतकऱ्यांना व बाजार समिती प्रशासनाला राजकीय भावनेतून अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप संचालक मंडळाने केला आहे. शासनाने अडत वसुलीवर बंदी घातली असताना पुसद बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून अडत वसुली केली जात आहे. यामुळे शेतकरी देखील या कारभारामुळे त्रस्त झाले असून कारवाईची मागणी केली आहे.

कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे भमाजी व्यापारी व संचालकांनी राजकीय द्वेशातून बाजार समिती बंद पाडण्याचा प्रकार सुरू केला आहे. शेतकऱ्यांस ते वेठीस धरत आहेत. त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. थकीत सेस रक्कम १२ टक्के व्याजानुसार वसूल करण्यात येईल. बाजार समितीच्या कायद्यानुसार ही वसुली करण्यात येणार आहे.

**-शेख कौसर शेख अख्तर, सभापती, कृ.उ.बा.स., पुसद.**

# धनोडाच्या पुलावरून ग्रामस्थांना करावा लागतो जीवघेणा प्रवास

■ महासागर प्रतिनिधी,

**महागाव, दि. ८ :** महागाव पैनगंगा नदीच्या पूलाला संरक्षण कठडे बसवण्याची मागणी सातत्याने होत आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडून अद्यापही या पूलाला संरक्षण कठडे बसवण्यात आलेले नाही. त्यामुळे या पूलावरुन प्रवास करताना वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. संबंधित प्राधिकरण जीवितहानी झाल्याशिवाय पूलाला संरक्षक कठडे बसवणार नाही का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. धनोडा ते कोठारी(किनवट) या राष्ट्रीय महामार्गावरील विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर धनोडा येथे असलेल्या पूलाचे संरक्षण कठडे पुराच्या पाण्यात वाहून गेले. परंतु, सात ते आठ महिन्यांचा कालावधी उलटूनही या पूलाला संरक्षण कठडे बसवण्यात आले नसल्याने वाहनधारकांना धोका पत्करून प्रवास करावा लागत आहे. या



पूलावरून साडेतीन शक्तीपीठ असलेल्या मातारेणुका, श्री दत्तशिखर, अनुसया माता मंदिर या ठिकाणी दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांच्या वाहनांची वर्दळ असते. तसेच प्रवाशी वाहनांची नेहमीच मोठी वर्दळ या पूलावरून होत असते. या पूलाची उंची अंदाजे ३० ते ४० फ़ुट आहे, तर खाली पैनगंगेचे विस्तीर्ण पात्र आहे. त्यामुळे या पूलाला संरक्षण कठडे नसल्याने वाहनधारकांच्या जीवाचा थरकाप उडत आहे. पूल पार करेपर्यंत पैल तीरावर सुखरूप पोहोचले पाहिजे, याकरिता वाहनधारक व प्रवाशांना आपला जीव मुठीत घेवुन देवाचा धावा करीत मार्गक्रमण करावे लागत आहे. या संरक्षक कठडे नसलेल्या पूलावरून नुकताच ट्रक नदी पात्रात कोसळला होता. सुदैवाने यामध्ये जीवितहानी झाली नाही. याआधीसुद्धा अनेक अपघात घडून नदी पात्रात वाहने कोसळल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व बांधकाम विभागाकडे संरक्षण कठडे बसवण्यात यावे, अशी मागणी केली होती. नागरिकांच्या जीवाचे कोणतेच सोयरसुतक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व संबंधित बांधकाम विभागाला नसल्याचे दिसत आहे. पैनगंगा नदीवरील पूलाला संरक्षण कठडे बसवण्याच्या मागणीसाठी अनेक वेळा जिल्हाधिकारी यवतमाळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना व सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देवून मागणी केली. परंतु, याकडे संबंधित अधिकारी, विभाग लक्ष द्यायला तयार नसल्याने त्यांना ग्रामस्थांच्या जिविताचे काहीही देणेघेणे नसल्याचे दिसते. वाहनधारकांच्या जीवाच्या सुरक्षेसाठी या पूलाला सुरक्षा कठडे बसवण्यात यावे, या मागणीसाठी पैनगंगेच्या पात्रात जलसमाधी आंदोलन करण्यात येणार आहे. प्रविण जयस्वाल, प्रदेश सचिव राष्ट्रवादी युवक काँग्रेस. कठडे नसलेला धानोडा मार्गावरील जुना धोकादायक पूल.

नव्याने उभारलेला पूल ठरला शोभेची वस्तू धनोडा ते कोठारी (किनवट) राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्यात आले असून या रस्त्यावरून वाहतुकही सुरू आहे. परंतु, पैनगंगा नदीवर नव्याने उभारलेला पूल अद्याप वाहतुकीसाठी खुला केलेला नाही. त्यामुळे वाहतूक जुन्या पूलावरूनच सुरू आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंमुळेच महिलांना समाजात सन्मान

## यशवंत विद्यालयामध्ये अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद, दि. ८ :** समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा व कर्मकांडाविरूद्ध महात्मा ज्योतिबा फुलेंच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करणाऱ्या महिलांचे चूल व मूल बंधन तोडून त्यांच्यासाठी शिक्षणाची दालन खुले करणाऱ्या सावित्रीमाईमुळेच महिलांना सन्मान मिळाला, असे प्रतिपादन विशेष अतिथी काजल राठोड यांनी सावित्रीबाई फुले जयंतीदिनी केले. मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार विद्यालय श्रीरामपूर येथे क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती अर्थात बालिकादिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश धर्माळे, तर प्रमुख अतिथी रूपाली भगत, विशेष अतिथी काजल राठोड उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून क्रांतिज्योती सावित्रीबाई फ़ुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. निखत परविन शेख, हिना शेख मुकद्दर यांनी सुरेल आवाजात स्वागतगीत सादर केले. मान्यवरांच्या स्वागतानंतर बाळकृष्ण मंदाडे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर आर्यन वाघमारे, अजय धुळधुळे, भगवान पाईकराव, गोपाल रनमले, दत्ता पांडे यांनी सावित्रीमाई फ़ुले यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. या वेळी प्रमुख अतिथी रुपाली भगत म्हणाल्या की, भारताची प्रथम शिक्षिका -मुख्याध्यापिका, स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात शिक्षणाचा प्रसार व अन्य





सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत पेटवणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांना जगण्याचे बळ मिळाले. मुख्याध्यापक गणेश धर्माळे म्हणाले की, दत्तक पुत्र यशवंत यांना मुलगी मिळत नसल्याने ससानेच्या राधाशी लग्न लावले, हा महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह होय. त्यांनी पहिले देशी ग्रंथालय सुरु केले. समता स्वातंत्र्य व विवेकनिष्ठेवर आधारित सत्यशोधक समाजाचे कार्य केले. काव्यफ़ुले, बावनकशी सुबोध रत्नाकर, सावित्रीबाईची गाणी वाचूनच कळते त्या किती ऊत्तम कवियत्री होत्या. महात्मा फुलेंच्या अंत्ययात्रेत टिटवे धरून अग्रभागी चालल्या व पार्थिवाला अग्नी दिला, ही पहिली क्रांती होय. त्यांच्यामुळेच आज महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. अमानुष रूढी परंपरा व कर्मकांडा विरूद्ध महात्मा फुलेंच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करून त्यांनी शेवटपर्यंत कार्य केले.

पुण्यात बुधवार पेठेतील भिडेवाड्यात काढलेल्या शाळेस राष्ट्रीय दर्जा प्राप्त व्हावा, असे आवाहन ही केले. विद्यार्थ्यांच्या भाषणाची प्रशंसा केली. कार्यक्रमाचे संचालन छाया वाघमारे, तर आभार विनोद पडघने यांनी केले.

पुसद तालुक्यातील शेंबाळपिंपरी येथील यशवंत विद्यालयाच्या प्रांगणमध्ये ३ जानेवारी रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी पालक शिक्षक संघ तसेच सखी सावित्री मंच यांची सभा उत्साहात पार पडली. यासाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेंबाळेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष संग्राम देशमुख, तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष राजकुमार वाहुळे, गावच्या पोलिस पाटील प्रतिभा कांबळे, सखी सावित्री मंचच्या सदस्या राजश्री देशमुख, वाकडे, सूर्यवंशी व इतर पालक सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. तसेच, सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र महल्ले यांनी कार्यक्रमाचे प्रास्तावित केले. संचालन राजनंदनी शिंदे यांनी केले.

# दारव्हातील नवजात अर्भक प्रकरणाचा उलगडा

## एकास अटक, डॉक्टरची चौकशी सुरू

■ महासागर प्रतिनिधी,

**दारव्हा, दि.८ :** शहरात एका नालीमध्ये मृत अर्भक आढळून आले होते. याप्रकरणी पोलिसांनी अनोळखी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात दारव्हा पोलिसांनी तातडीने सूत्रे हालवून तपास सुरू केला. त्यात मंगळवारी ७ जानेवारी रोजी एका आरोपीस अटक करण्यात आली असून एका डॉक्टरलाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीतून पोलिसांनाही धक्का बसला आहे.

या प्रकरणाच्या तपाससादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन मंगळवारी तालुक्यातील एका १६ वर्षीय अल्पवयीन बालिकेस बोलावून विश्वासात घेवून विचारपूस करण्यात आली. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले. पीडित बालिका ही दारव्हा शहरात एका विद्यालयात रोज बसने ये-जाकरत होती.

१० महिन्यांपूर्वी तिची आकाश राठोड नावाच्या युवकाशी ओळख झाली. या ओळखीचे रूपांतर काही दिवसात प्रेमात झाले. यात दोघांत शारिरीक संबंध प्रस्तापित झाले. दरम्यान, पीडितेस गर्भधारणा झाली. भितीपोटी तीने ही बाब कोणाला सांगितली नाही. मात्र, आकाश राठोड यास याबाबत माहिती दिली.

त्यानंतर आरोपी आकाश राठोड व तो चालवत असलेल्या वाहनाचा चालक विलास चव्हाण यांनी शुकवारी ३ जानेवारीला पीडितेस गर्भपाताच्या गोळ्या उपलब्ध करून दिल्या. पीडितेने दिलेल्या या संपूर्ण माहितीवरून पोलिसांनी आरोपी विलास चव्हाण याला अटक केली आहे. सोबतच चौकशीसाठी त्या डॉक्टरलाही ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून इतर आरोपींचा शोध घेत आहे. पुढील तपास ठाणेदार विलास कुलकर्णी, सपोनि दिनेश गावंडे, पंकज राठोड, विजय फोपसे विलास राठोड, सुरेश राठोड करत आहेत.

दवाखान्या जवळच पीडितेची प्रसूती शुक्रवारी ३ जानेवारीला रात्री पीडितेने आरोपीने दिलेल्या गोळ्या सेवन केल्यानंतर शनिवारी सकाळी तिला वेदना होवू लागल्या.

त्यामुळे तिच्या आई-वडिलांनी दारव्हा शहरातील एका डॉक्टरकडे तिला तपासणीसाठी आणले. डॉक्टरने तपासणी करून तिला उपचारासाठी इतरत्र घेऊन जाण्याचा सल्ला दिला. मात्र, त्याच वेळेस दवाखान्या जवळच पीडितेची प्रसूती झाली. तिने एका मृत बाळाला जन्म दिला. भितीपोटी तीने ते मृत नवजात अर्भक तेथे असलेल्या नालीत फेकून दिले.

# सीसीआयकडे कापसाचा ओघ १० दिवसांत ५७ हे. क्विंटलची खरेदी

■ महासागर प्रतिनिधी,

**मारेगाव, दि. ८ :** तालुक्यात यंदा अतिवृष्टीमुळे कापूस पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांना कापसाच्या उत्पादनात मोठा आर्थिक फटका बसला आहे. यातही हाती आलेल्या कापसाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या. यामुळे खासगी कापूस बाजारात दिवाळीनंतरही कापसाची तुरळक आवक होती. परंतु, मागील १० दिवसांपासून सीसीआय बाजारात कापूस खरेदीसाठी आल्याने बाजार बदलला आहे. १० दिवसांत तालुक्यात सीसीआयने तब्बल ५७ हजार क्विंटल कापसाची खरेदी केली असून यामुळे बाजारात तेजी आली आहे.



देशात पांढर सोन म्हणून ओळख असलेल्या कापूस पिकाची तालुक्यात सर्वाधिक लागवड केली जाते. एकट्या मारेगाव तालुक्यात ३२ हजार हेक्टरच्या वर कापसाची लागवड झाली आहे. नगदी पीक म्हणून शेतकरी कापूस पीक घेतात. तालुक्यातील शेतकऱ्यांचा कापूस पीक हा कणा आहे. मात्र, हेच कापूस पीक चुकीच्या धोरणाने शेतकऱ्यांना कर्जबाजारी करत आहे. याहीवर्षी कापसाचे भाव वाढलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांत निराशा पसरली आहे. सीसीआयकडून मारेगाव तालुक्यातील बाजार समितीच्या माध्यमातून मारेगाव येथे तीन जिनिंगमध्ये, तर मार्डी येथील एका जिनिंगमध्ये सध्या कापूस खरेदी सुरु आहे. या कापसाला केंद्र शासनाने ७ हजार ५२१ रुपयांचा दर जाहीर केला होता. मात्र, तालुक्यात सीसीआयची कापूस खरेदी उशीरा सुरु झाल्याने ग्रेड कमी झाले. सध्या कापसाच्या प्रतवारीनुसार ७ हजार ४७१ रुपये प्रतिक्विंटल दर देण्यात येत आहे. कापसाचे दर स्थिर असल्याने कापूस उत्पादक शेतकरी खासगी व्यापाऱ्याकडे पाठ फिरवून सीसीआयला कापूस देत आहे. सध्या सर्व केंद्रांवर कापूस काटा करुन नोंदणी, तसेच रक्कम शेतकऱ्यांना ऑनलाइन खात्यावर मिळत आहे.

बाजारात उलाढाल वाढली मागील काही वर्षे तालुक्यात सीसीआयची कापूस खरेदी नसल्याने तालुक्यातील कापूस बाहेर जात होता. त्यामुळे ५० हजार क्विंटलचा टप्पाही गाठला जात नव्हता. प्रारंभी खासगी व्यापाऱ्या ऱ्यांनी कापसाला ६ हजार ५०० रुपयांचा दर दिल्याने आवक कमी होती. खासगी व्यापाऱ्यांनी आतापर्यंत ९ हजार क्विंटल कापूस खरेदी केल्याची माहिती आहे. तालुक्यातील कापूस आवक वाढल्याने बाजारात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली आहे. या उलाढालीमुळे बाजारालाही गती आली आहे. येत्या काळात ही आवक सुरु राहून १ लाख क्विंटलचा टप्पा पूर्ण करण्याची शक्यता आहे.

## जिल्हा परिषद शाळेतील वर्गखोल्यांच्या भिंतींना तडे

**डोणगाव :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील जुन्या वर्गखोल्यांच्या भिंतींना तडे गेले असून, विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने नवीन इमारतीचे बांधकाम करण्याची मागणी पालकांसह ग्रामस्थांकडून केली जात आहे. डोणगाव ही जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ तसेच मोठ्या लोक संख्येची ग्रामपंचायत असलेले गाव आहे. येथील आठवडी बाजारात सनब १८७० रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची स्थापना करून पहिली ते पाचवीपर्यंत वर्ग सुरू करण्यात आले होते. सद्य:स्थितीत या शाळेत पहिली ते पाचवीपर्यंत २७२ विद्यार्थी शिकत आहेत. शाळेत एकूण १२ वर्ग खोल्या आहेत.

# विविध गीतांच्या सादरीकरणाने श्रोते मंत्रमुग्ध

## दिवंगत माधुरी पंडित यांच्या स्मृतीत संगीत समारोह

■ महासागर प्रतिनिधी,

**दिग्रस , दि. ८ :** दिग्रस येथील साहित्यिक डॉ. रविकिरण पंडित यांच्या दिवंगत पत्नी माधुरी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संगीत समारोह स्थानिक राष्ट्रमाता जिजाऊ सांस्कृतिक भवनात नुकताच पार पडला. या समारोहाचे उद्घाटन जालनाचे नेत्रतज्ज्ञ डॉ. मंगेश ढोबेकर, मंगला ढोबेकर, नयना वाळेकर, सविता अर्धापुरकर, वैभव वाळेकर, सुधीर लकडे आणि संतोष ढोबेकर या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले.



ख्यातनाम गायक श्रीधर झरकर यांनी उत्कृष्ट गायिलेल्या तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता या अष्टविनायक चित्रपटातील गणेशस्तवनानंतर डॉ. रविकिरण पंडित यांनी त्यांच्या पत्नीला उद्देशून गायिलेल्या स्वरचित गीताने श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर वैशाली गावंडे यांच्या रहे ना रहे हम आणि तू जहाँ जहाँ चलेगा... या प्रसंगाला अनुरूप दोन गीतांनी वातावरण भारून टाकले. विनोद टेहरे यांच्या दमदार आवाजातील मेरा प्यार वो है कि मरकर भी तुमसे..या गीताने वातावरणातील गांभीर्य अधिक गडद केले आणि त्यांच्या खुदा भी आसमॉसे जब जमीपर देखता होगा, या दुस?या गीतातील स्त्रीसौंदर्याने श्रोते भारावले. डॉ. अल्फा रोकडे यांनी भले बुरे जे घडून गेले विसरून जाऊ सारे क्षणभर.. या गीतातून पंडित परिवाराच्या दुःखावर सहानुभूतीची फ़ुंकर मारली. मोगरा फुलला हा ज्ञानेश्वरांचा अभंग गाऊन त्यांनी स्वतःच्या गायकीचा सुगंध श्रोतृवृंदात पसरवला. जनार्दन सावळकर यांनी गायिलेली चाहूंगा मैं तुझे सांझ सवेरे आणि पल पल दिलके पास ही दोन गाणी भाव खाऊन गेली.

सुनीता वाकडे यांनी केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली.. हे सदाबहार गीत तेवढ्याच समर्थपणे सादर केले. अशोक पंडित यांनी गायिलेल्या तुम अगर साथ देने का वादा करो, आणि तेरे नाम का दिवाना तेरे घर को ढूंढता है.. या गाण्यांनी श्रोत्यांची दाद मिळवली. डॉ. नीता लाभसेटवार यांनी "अजीब दास्तों है ये कहाँ शुरू कहाँ खतम.." है गीत सादर केले. दिग्रसचे संगीत तत्ज्ञ दीपक निळे, डॉ. अनंत सूर्यकार यांनीही श्रोत्यांची मने जिंकली.

पारिजात कवितेने भावूक डॉ. रविकिरण पंडित यांनी मधूबन में राधिका नाचे रे.. या गीतातील आलाप, ताना, तराना व्यवस्थित गाऊन शास्त्रीय संगीतातील आपले नैपुण्य सिद्ध केले.

तसेच आपल्या पारिजात या कवितासंग्रहातील दिवंगत पत्नीस या कवितेने त्यांनी केलेली संगीत समारोहाची सांगता श्रोत्यांच्या हृदयाला स्पर्श करून गेली. प्रशांत आत्राम यांची तबल्याची साथ आणि ऋषिकेश सोन्नर यांची हार्मोनियमची संगत गायकांच्या गीतांना लाभली. पूर्वार्धाचे संचालन डॉ. अपर्णा पाटील यांनी, तर उत्तरार्धाचे संचालन डॉ. रविकिरण पंडित यांनी केले.

## आपल्या विकासाप्रती सदैव समर्पित राहील

**बाभूळगाव :** बाभूळगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांनी केलेल्या विशेष सत्काराने आज भारावून गेलो. या प्रभागाचा विकास व तळागाळातील प्रत्येक कार्यकर्त्यांप्रती सदैव समर्पित राहील, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली. बाभूळगाव येथील हर्षितानगरी परिसरात तालुका भाजपच्या वतीने शनिवारी ४ जानेवारीला सायंकाळी नागरी सत्काराचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा समन्वयक राजू पडगिलवार, कळंब न. पं. माजी उपनगराध्यक्ष मनोज काळे, अमोल ढोणे, अमर दिनकर, भास्कर कोल्हे, सुनिल घोटकर, विधानसभा संपर्क प्रमुख सतीश मानलवार, विधानसभा समन्वयक प्रकाश भुमकाळे, प्रज्ञा भुमकाळे, तालुकाध्यक्ष नितीन परडखे, शहराध्यक्ष अनिकेत पोहोकार, हेमंत ठाकरे, अविनाश दहेकर, महिला जिल्हा सहमंत्री ललीता वर्मा, महिला तालुकाध्यक्षा निलीमा अजमिरे, संजय राठी, अशोक भगत, शिवसेना तालुका प्रमुख वसंत जाधव, नगरसेविका वृंदा पिसे, सुरेश वर्मा, गौतम लांडगे, रमेशपंत कात्रे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मंत्री डॉ. उईके यांना व्यासपीठापर्यंत नेण्यासाठी कमळाच्या फुलाच्या सजावटीचे वाहन तयार केले होते. आतषबाजी करत जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले. स्थानिक मातृशक्ती, दुर्गा वाहिनीच्या महिलांनी त्यांचे औक्षवण केले.


# नगर परिषद उमरेड जिल्हा - नागपूर

Tele no 07116-242007 (Office) Fax No. 07116-242557 E-mail nagarparishadumred@gmail.com

जाहीरात क्र-एमसीयु/स्व.वि /१३४०/२०२५ दिनांक : ०७/०१/२०२५

**निविदा सूचना कमांक १३ /२०२५**

सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरीता स्वच्छता विभागाकरिता नगर परिषदेच्या खालील नमुद कामाकरीता पजिकृत / अनुभवी कंत्राटदार / पुरवठाधारक यांचेकडून दिनाक ०८/०१/२०२५ ते १५/०१/२०२५ पर्यंत २ लिफाफा पध्दतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना दिनांक ०८/०१/२०२५ ला स. ११.०० वाजेपासुन स्वच्छता विभाग कार्यालयात उपलब्ध राहील. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अक्र | कामाचे विवरण | अंदाजपत्रकीय किमत | कोरे निविदा पत्राची किमत | अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत दुर्गानगरी प्लॉट येथे गार्डन डेव्हलेपमेंट करणे बाबत. | रु.५,७५,६३५/- | रु ५००/- | रु ५७५६/- | ३ महिना |
| २ | माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत बांबू लागवडीचे काम करणे बाबत. | रु.१,६६,८६८/- | रु. ५००/- | रु. १६६९/- | ३ महिना |

निविदा प्रसिध्दीचा तपशिल

| | |
|---|---|
| ऑफलाईन निविदा प्रसिध्दी | दि ०८/०१/२०२५ वेळ सकाळी ११.०० वाजता |
| निविदा दाखल करण्याचा कालावधी | दि. ०८/०१/२०२५ वेळ सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि १५/०१/२०२५ ला सां. ६.०० वाजेपर्यत |
| निविदा लिफाफा क. १ (Technical Bid) उघडण्याचा दिनांक, वेळ व स्थळ | दि १६/०१/२०२५ ला सकाळी १२.०० वाजेपर्यत मा. मुख्याधिकारी, नगर परिषद उमरेड याच्या कक्षात |

अटी व शर्ती -

१) निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदेची पुढील सर्व कार्यवाही कार्यालयात पाहावयास मिळेल.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद उमरेड



मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ गुरुवार, दि. ९, जानेवारी २०२५ ■

# आरक्षित भूखंडावर लेआऊट टाकून भूखंडांची विक्री

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ८

दोन प्रॉपर्टी डीलर्सनी आपसात संगणमत करून आरक्षित भूखंडावर लेआऊट टाकला आणि लोकांना प्लॉटची विक्री केली. बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी दोघांविरुद्धही गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. अरुण रामभाऊ कपारे (55) रा. वैष्णवदेवीनगर, जुना कामठी रोड आणि मोहम्मद इजाज मोहम्मद अयूब (45) रा. एकतानगर, वांजरा लेआऊट अशी आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी गणेश अंगू स्वामी (53) रा. मोहननगर यांचे कॉल सेंटर आहे. 2023 साली एका मित्राच्या माध्यमातून त्यांना भिलगाव परिसरात खांडेकर कुटुंबाची जमीन असल्याची माहिती मिळाली. खांडेकर कुटुंबाला ती जमीन विकायची होती, मात्र जमीन कोतवाल डोंगा अंतर्गत आरक्षित होती. गणेश आणि त्यांच्या 5 भागीदारांनी ती जमीन खरेदी करण्याचा सौदा केला. गणेशच्या भागीदाराने जमीन वर्ग 2 मधून काढत वर्ग 1 मध्ये टाकण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्याकडे अर्ज केला. प्रशासनाकडून आरक्षण हटविण्यात आले.

तसेच 4.75 एकर जमिनीपैकी एक एकर जमीन सरकारला देण्याचे आदेश दिले. कागदपत्रांच्या पडताळणीत समोर आले की, खांडेकर कुटुंबाने अरुण कपारेच्या मध्यस्थीने तो भूखंड रमेश बिनेकरला विकण्याचा सौदा केला होता. खांडेकर कुटुंबाच्या सदस्यांनी यावर आक्षेप घेतला होता. प्रकरण न्यायालयात गेले आणि बिनेकरचा सौदा रद्द करण्यात आला.

आरोपी अरुण कपारे याने या जमिनीचे आरक्षण हटविण्यसाठी बिनेकर कुटुंबाशी करार केला. कुटुंबातील सदस्यांच्या गैरहजेरीत बनावट सही करून कपारे याने इजाजच्या मदतीने कागदपत्र तयार केले. नंतर त्या जमिनीवर स्वतःचा लेआऊट टाकून पॉवर ऑफ अटर्नीच्या माध्यमातून लोकांना प्लॉटची विक्री केली. आता या जमिनीवर अनेकजण घर बांधून रहात आहेत. कपारे आणि इजाजने खांडेकर कुटुंबासोबतच प्लॉटधारकांचीही फसवणूक केली. आरक्षित जमीन गैरकायदेशीररित्या विकली.

सर्व कागदपत्रांसह गणेश यांनी प्रकरणाची तक्रार यशोधरानगर पोलिसात केली. पोलिसांनी कपारे आणि इजाजविरुद्ध विविध कलमान्वये फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीची इतरही प्रकरणे नोंद असल्याची माहिती मिळाली आहे.

# राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलन १२ जानेवारीपासून

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व अभिनेते अंकुश चौधरी यांची उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ८

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी ज्ञानभाषा व्हावी ही जिद्द मनाशी बाळगून आम्ही मराठी ही चळवळ सुरू करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने, नूतन भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, विदर्भ साहित्य संघ, नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग नागपूर, कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने 12 ते 14 जानेवारी 2025 या कालावधीत राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.




कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रविवार, 12 जानेवारी रोजी सायं. 6 वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून मराठी सिने कलावंत अंकुश चौधरी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. संमेलनाचे अध्यक्षपद अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे भूषविणार असून स्वागताध्यक्ष विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदिप दाते हे राहतील.

याप्रसंगी सर्व आमदार अभिजीत वंजारी, मोहन मते, प्रविण दटके, विभागीय शिक्षण उपसंचालक उल्हास नरड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रोहिणी कुंभार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सिध्देश्वर काळुसे, डस्कलाईन इंफ्रा. लि.चे संचालक समीर महाजन, विदर्भ साहित्य संघाचे सचिव विलास मानेकर आणि मनपाच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे पियुष आंबुलकर यांची विशेष उपस्थिती राहील. तत्पूर्वी, ग्रंथ दिंडीचे आगमन व पूजन झाल्यानंतर सायं. 5.30 वाजता मराठी बँडचे विशेष सादरीकरण होणार आहे.


सोमवार 13 जानेवारीला सकाळी 10 ते 11.30 वाजता बालभारती आणि मराठी मनाचे नाते या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आलेला आहे. त्यानंतर 11:45 ते 1. 25 पर्यंत मराठी सद्यस्थिती व ज्ञानभाषा दिशा तर 3.45 ते 5.15 या वेळात ज्ञानभाषा प्रवासात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींची भूमिका या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले आहे. दुपारी दोन ते साडेतीन पर्यंत माजी शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षकांचे शैक्षणिक नवोपक्रम सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. संध्याकाळी 5.30 ते 6.30 या वेळात कवी संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे.

14 जानेवारीला सकाळी 10 ला संमेलनाध्यक्ष डॉक्टर रवींद्र शोभणे यांच्या उपस्थितीत समारोपिय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. 12 ते 14 जानेवारी ला होणाऱ्या भरगच्च कार्यक्रमात नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येत सहभागी होण्याचे आवाहन रवींद्र काटोलकर, रमेश बक्षी, डॉ. वंदना बडवाईक, सध्या महाजन यांनी पत्रकार परिषदेत केले.

# लाव्हयात पेंटच्या कारखान्याला आग

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ८

लाव्हा येथील मत्सगंधा सोसायटी मधील निक्कू ढाब्बाच्या पेंट बनविन्याचे कारखान्याला बुधवार ८ जानेवारी रोजी संध्याकाळी ५.३० वाजताच्या सुमारास आग लागली. यावेळी पेंट बनविण्यासाठी लागणारे साहीत्य ,थिनर , डांबर जळून खाक झाले आहे. वाडी नगर परिषदच्या फायर ब्रिगेड गाडीने आग विझवीने सुरु आहे. यावेळी वाडी पोलीस ठाणेचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहे.



# ट्रकच्या धडकेत वृद्ध गार्डचा मृत्यू

**नागपूर :** ट्रकच्या धडकेत गंभीर जखमी वृद्ध सुरक्षा रक्षकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घटनेच्या वेळी ते कामावरून सायकलने घरी जात होते. दरम्यान ट्रकने त्यांना जबर धडक दिली. भाग्यवान हरीभाऊ कांबळे (64) रा. सावित्रीबाई फुलेनगर असे मृताचे नाव आहे. कांबळे सुरक्षा रक्षकाचे काम करीत होते. सोमवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास ते कामावरून सायकलने घरी जात होते. अजनी चौकाजवळील मेट्रो पिल्लरसमोर ट्रक क्र. एमएच-31/सीक्यू-8939 च्या चालकाने त्यांच्या सायकलला धडक दिली आणि पळून गेला.

# आठवडी बाजारांमधून वाहन चोरी करणारा गजाआड

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ८

आठवडी बाजारांमधून दुचाकी वाहन चोरी करणाऱ्या एका आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी सापळा रचून अटक केली. चौकशीत त्याने शहरातील वेगवेगळ्या भागातून 20 वाहन चोरी केल्याची कबुली दिली. नवीन देविदास रासा (37) रा. महाकाली कॉलनी, चंद्रपूर असे अट-केतील आरोपीचे नाव आहे.

नवीन दीड वर्षापुर्वी रोजगाराच्या शोधात नागपुरात आला होता. लोकमान्यनगरात भाड्याने खोली घेऊन एमआयडीसीच्या एका कंपनीत काम करीत होता. मिळणाऱ्या वेतनातून घरखर्च भागवणे कठीण झाले होते. त्यामुळे त्याने वाहन चोरी करण्याचा मार्ग पत्करला. त्यासाठी त्याने मास्टर की सुद्धा बनवून घेतली होती. एमआयडीसी परिसरात मंगळवारी आणि शनिवारी भरणाऱ्या आठवडी बाजारांतून त्याने वाहन चोरी करण्यास सुरूवात केली. सोबतच त्याने अंबाझरी, अजनी आणि कोतवाली परिसरातील बाजारामधूनही वाहन चोरी केले. ठाण्यांतर्गत बाजार परिसरातून वाहन चोरीच्या घटना वाढल्याने एमआयडीसी पोलिस सतर्क झाले. आरोपीला रंगेहात पकडण्याची योजना बनविण्यात आली. बाजार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता एका ठिकाणी आरोपी दिसला. त्या आधारावर आठवडी बाजार आणि मेट्रो स्थानक परिसरात सापळा रचण्यात आला.

### १०-१५ हजारांत विकायचा चोरीचे वाहन

लोकमान्यनगर मेट्रो स्थानकाच्या पार्किंगमध्ये नवीन संशयास्पदरित्या फिरताना पोलिसांना दिसला. त्याच्याजवळ पोलिसांना एमएच-40/एपी-8326 क्रमांकाचे वाहन होते. त्याला ताब्यात घेऊन वाहनाची कागदपत्रे मागितली असता तो घाबरला. त्याला ठाण्यात आणून सखोल चौकशी केली असता त्याने वाहन चोरीचे असल्याची माहिती दिली. पोलिस कोठडीदरम्यान त्याने शहरभरातून 20 वाहन चोरी केल्याची कबुली दिली. चोरीचे वाहन तो चंद्रपूर आणि गडचिरोलीत 10 ते 15 हजार रुपयांत विकत होता. पोलिसांनी सर्व वाहन जप्त केले.

# रेल्वेरुळाच्या बांधकामावरून तीन किशोरवयीन मजूरांची मुक्तता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

कामगार विभागाच्या पथकाने टाकलेल्या धाडीत कोराडी पोलिस ठाणे अंतर्गत गोधनी-बोखारा परिसरातील नवीन रेल्वे मार्ग टाकण्याच्या कामावर अवजड व धोकादायक काम करीत असलेल्या १४ ते १६ वयोगटातील तीन किशोरवयीन मुलांची मुक्तता केली.




मागील काही दिवसांपासून अपर कामगार आयुक्त किशोर दहीफळकर यांचे निदेर्शानुसार बाल व किशोरवयीन कामगार नियमन व निर्मूलन अधिनियम 1986 व सुधारित अधिनियम 2016 अंतर्गत बाल व किशोरवयीन कामगार मुक्ती अभियान राबवण्यात येत आहे. यानुसार सहाय्यक कामगार आयुक्त राजदीप धुर्वे यांच्या मार्गदर्शनात बाल व किशोरवयीन कामगार मुक्ती अभियान पथकाची ही तिसरी कारवाई होती.

गोधनी रेल्वेस्टेशनजवळ कुठल्याही सुरक्षासाधनाशिवाय धोकादायक ठिकाणी किशोरवयीन मजुरांकडून रेल्वे रूळावर सिमेंटचे स्लीपर उचलण्याचे अवजड काम करवून घेण्यात येत असल्याचे आढळून आले. सदर काम धोकादायक उद्योगात येत असल्याने कंत्राटदाराविरुद्ध कोरडी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३, कलम १४६, अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५, कलम ७५, ७९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सोबतच किशोरवयीन कामगारांची मुक्तता करण्यात आली. कंत्राटदाराने हे मजूर मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्यातून आणले होते.

गाड्यांच्या दुरुस्ती दुकानात काम करणाऱ्या एका मुलाची सुटकाही काळ करण्यात आली. या मुलाची कौटुंबिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती लक्षात घेऊन त्याला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. मुलाचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी त्याच्या शाळेत जाऊन शिक्षकांना त्याच्या गैरहजेरीबाबत विचारणा करून समाज देण्यात आली. सदरील धाडसी कारवाई अविनाश ढोके यांचे नेतृत्वात निरीक्षक शिंगाडे, गायत्री दुबे, जिल्हा बालरक्षण समन्वयक प्रसेनजीत गायकवाड, जिल्हा महिला कार्यालयाच्या बालसंरक्षण कक्ष कार्यकर्त्या पूजा कांबळे, ग्रामीण समस्यामुक्ती ट्रस्टच्या समन्वयक प्रियंका बागडे यांनी संयुक्तपणे कार्यवाही केली.

# अल्पवयीन चोर गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने जरीपटकाच्या समतानगरात पानठेल्याचे कुलूप तोडून चोरी प्रकरणात 3 अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्हा कबूल केला.

पोलिसांनी त्यांच्याकडून वाहनासह एकूण 1,03,981 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. फियार्दी प्रिंस रजनी सेन (22)रा. बाबा दीपसिंगनगर याचा समतानगर पुलाजवळ किंग्स पान पंचायत नावाने पानठेला आहे. गत 5 जानेवारीच्या रात्री अज्ञात आरोपींनी पानठेल्याचे कुलूप तोडून विविध कंपनीचे सिगारेट, बिडीच्या पाकिटांसह रोख 4 हजार रुपये चोरून नेले होते. दुस ऱ्या दिवशी सकाळी ही चोरी उघडकीस आल्यानंतर प्रिंसने जरीपटका ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

या प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट 5 कडूनही सुरू होता. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर एका अल्पवयीनला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने इतर दोन साथीदारांसोबत मिळून प्रिंसचा पानठेला फोडल्याची माहिती दिली.

# एसटीच्या इलेक्ट्रिक बस तोट्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी बस) इलेक्ट्रिक बस प्रकल्प तोट्यात असल्याचा धक्कादायक दावा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

इलेक्ट्रिक बस प्रकल्पात एसटीचे सरासरी एका किलोमीटर मागे २० रुपये इतके नुकसान होत असून सद्या या प्रकल्पाअंतर्गत एकूण १६८ बस सुरू आहेत. भविष्यात येणाऱ्या एकूण सर्व ५ हजार १५० बस पूर्णपणे एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या व करारात ठरल्या प्रमाणे या प्रकल्पातील बस मार्गावर चालल्या नाहीत तरी त्यांना प्रतीदिवस प्रती बस ठरलेली ३२५ किलोमीटरची हमी रक्कम द्यावी लागेल.

दरम्यान, ५ हजार १५० बसेस सरासरी १५.४५ लाख किमी अंतर चालल्या किंवा नाही चालल्या तरी किमान प्रतीदिवस प्रती बस प्रती कि.मी. २० रुपये इतका तोटा होऊन सुमारे ३ कोटी २५ लाख रुपये इतका खर्च होईल व तेवढाच तोटा सहन करावा लागणार आहे. त्याच प्रमाणे महिन्याला सुमारे १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागणार असून वर्षाला सुमारे एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागणार आहे. त्यामुळे आता ज्या गाड्या सुरू आहेत. त्यांचा एकंदर अभ्यास करून फेरविचार करण्याची गरज असून या पुढेसुद्धा हा प्रकल्प चालवायचा असेल किंवा रद्द करायचा असेल तर अभ्यास समिती नेमण्याची गरज असून भाडे तत्वावर बस पुरविणाऱ्या कंत्राटदार कंपन्यांनी इतर शासकीय उपक्रमामध्ये किंवा इतर राज्यांमध्ये काय दर निश्चित केले आहेत. तिथे हे दर का कमी आहेत, यावरही अभ्यास केला पाहिजे, असे महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले.

एसटीच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या १ हजार ३१० भाडे तत्वावरील बस कंत्राटाच्या निविदेत हेराफेरी झाली व ऐनवेळी नियम व अटी विशिष्ट कंत्राटदारांना फायद्याच्या ठरतील अशाच पद्धतीने टाकण्यात आल्याने शंका निर्माण झाली आहे.

# जिल्ह्यात नऊ महिन्यांत वीजचोरीची २,७९७ प्रकरणे उघडकीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

एप्रिल ते डिसेंबर 2024 या नऊ महिन्यांत महावितरणकडून नागपूर जिल्ह्यातील 2 हजार 797 ठिकाणी थेट वीजचोरी करणा-यावर कारवाई करण्यात आली आहे. सोबतच प्रत्यक्ष कारणाव्यतिरिक्त इतर कारणासाठी अथवा अप्रत्यक्ष वीज वापर करणा-या 195 ग्राहकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे.




वीज चोरी विरोधात नऊ महिन्याच्या काळात महावितरणने केलेल्या या कारवाईत नागपूर जिल्ह्यातील वीजचोरी करणा-या 2 हजार 797 ग्राहकांनी तब्बल 4 कोटी 94 लाख रुपयांच्या 25 लाख 57 हजार 24 युनिटची वीजचोरी केल्याचे निदर्शनास आले. वीजचोरीपोटीच्या देयकांसह 2 हजार 690 ग्राहकांना तडजोडीपोटी 1 कोटी 11 लाखाचा दंड ठोठविण्यात आला असून 29 ग्राहकांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या 2 हजार 797 ग्राहकांमध्ये तारांवर आकडा टाकून वीजचोरी करणा-या 1 हजार 501 ग्राहकांचा तर 1 हजार 296 ग्राहकांनी प्रत्यक्ष मीटरमध्ये छेडछाड, मीटर बंद पाडणे, मीटर दुरून बंद करण्यासाठी रिमोटचा वापर करणे, छिद्र करून मीटरमध्ये रोध निर्माण करणे किंवा मीटरची गती संथ करणे या माध्यमातून थेट वीजचोरी केलेली आहे.

याशिवाय प्रत्यक्ष कारणाव्यतिरिक्त इतर कारणासाठी अथवा अप्रत्यक्ष वीज वापर करणा-या 195 ग्राहकांना 2 लाख 33 हजार 356 युनिट वीजेचा अप्रत्यक्ष वापर केल्या प्रकरणी 54 लाखांचे देयक आकारण्यात आले आहे

वीजचोरी पकडण्यासाठी महावितरण सातत्याने वीजचोरीविरोधात मोहीम राबवते. महावितरणकडून नागपूर जिल्ह्यात राबवण्यात आलेल्या मोहिमेदरम्यान एप्रिल-2024 ते डिसेंबर-2024 या नऊ महिन्यांत उघडकीस आणलेल्या वीज चोरीच्या प्रकरणामध्ये मीटरमध्ये छेडछाड करणे, मीटर बंद पाडणे, मीटर दुरून बंद करण्यासाठी रिमोटचा वापर करणे, मीटरच्या मागच्या बाजूने छिद्र पाडत मीटरमध्ये रोध निर्माण करून मीटर बंद पाडणे किंवा मीटरची गती संथ करणे असे अफलातून प्रकार उघडकीस आले आहेत.

वीज चोरांविरोधातील मोहीम अधीक आक्रमक करण्याचा निर्णय महावितरणतर्फे घेण्यात आला असून या मोहिमेत सदोष मीटर, सरासरी वीज बिल असणाऱ्या सर्वच ग्राहकांची तपासणी करण्याला सुरुवात देखील करण्यात आली आहे. तसेच थकबाकीपोटी कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेले सवलत देऊनही अभय योजनेत सहभागी झाले नसलेल्या ग्राहकांविरोधात कठोर कारवाई करण्याचा निर्णय देखिल महावितरणने घेतला असल्याने अशा सर्वच ग्राहकांच्या प्रत्यक्ष तपासणीला सुरुवात करण्यात आली आहे.

वीजचोरीच्या अनधिकृत विद्युतभारामुळे विद्युत तारांवर, रोहित्रावर त्याच्या मर्यादेच्या पलीकडे भार पडतो, परिणामी रोहित्रात बिघाड होतो. शॉर्ट सर्किट होऊन वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडतात. त्याचा नाहक त्रास नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांना होतो व महावितरणलाही त्याचा मोठा आर्थिक फटका बसतो.

याशिवाय वीजपुरवठा खंडित झाल्यावर महावितरणला ग्राहकाच्या रोषाला सामोरे जावे लागते, सबब सर्व ग्राहकांनी विजेचा रितसर मीटर घेऊनच वापर करावा आणि वापरलेल्या वीजेच्या देयकांचा नियमित भरणा करण्याचे आवाहन महावितरणतर्फे. करण्यात आले आहे.

# २० दुचाकी चोरणारा अट्टल गुन्हेगार एमआयडीसी पोलिसांच्या जाळ्यात




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :

एम.आय.डी.सी पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल २० दुचाकी करणाऱ्या एका कुख्यात आरोपीला मोठ्या शिताफीने अटक केली. आज एमआयडीसी पोलीस ठाण्यात डीसीपी लोहित मतानी यांनी ही माहिती दिली. नविन देविदास रासा (वय ३७)हल्ली मुक्काम लोकमान्य नगर, हिंगणा रोड नागपूर (मूळ निवासी प्रकाश नगर, चंद्रपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नावे आहेत. पोलिसांनी या आरोपींकडून 20 दुचाकी आणि एक मोबाईल एकूण 13 लाख 5 हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

एमआयडीसी परिसरात आयसी चौक येथील आठवडी बाजारातून दुचाकी चोरी होण्याच्या घटना घडत होत्या.पोलीस या दुचाकी चोराचा शोध घेत होते. पोलिसांना खबऱ्यांनी माहिती दिली. त्यानुसार चंद्रपूर ग्रामीण भागात येथून चोरी गेलेली दुचाकी विकली असल्याचे निष्पन्न झाले. त्याआधारे एमआयडीसी पोलीस टीम तिथे गेली. त्या गाडीचा शोध घेतला. तेथून पोलीस पथकाला ती दुचाकी नागपूर येथे असलेल्या इसमाकडून ती विकल्याचे कळले. त्यानंतर गुप्त माहिती व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेत मेट्रो स्टेशन, हिंगणा रोड येथे ट्रॅप लावून पोलिसांनी आरोपीला अटक केली. त्यांच्या कबुली जबाबानुसार विविध ठिकाणांहून चोरीस गेलेल्या २० वाहनांचा शोध घेऊन ते सर्व जप्त करण्यात आले आहे. आरोपींला पोलीस कोठडी देण्यात आली असून एमआयडीसी पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे.

आज एमआयडीसी पोलीस ठाण्यात डीसीपी लोहित मतानी एसीपी सतीश गुरव यांनी हजेरी लावून एमआयडीसी पोलीस ठाण्याचे तपासातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.सुरवातीला पोलिसांनी त्याला अटक केली तेव्हा त्यांनाही कल्पना नव्हती पण हळूहळू एक-एक अशा २० वाहनांचा शोध लागला सर्व दुचाकी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आणण्यात आल्या.

पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल, उपायुक्त लोहित मतानी, एसीपी सतीश गुरव यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार महेश चव्हाण, सहा पोलीस निरीक्षक संजय बनसोड व हवालदार पवन यादव, ओमप्रकाश खंडाते, राजेश बरठी, विजय जाने, अभिषेक हरदास, सचिन सोनवणे व इस्माईल नौरंगाबादे यांनी हा गुन्हा उघडकीस आणण्यात महत्वाची कामगिरी बजावली.

# अखेर कोंढाळी ग्रामीण रुग्णालयाच्या रखडलेल्या कामाला झाली सुरुवात

## जिप सदस्य सलील देशमुख यांची कोंढाळी ग्रामीण रूग्णालय व बसस्थानाला भेट



■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. ८ :

येथील बहुप्रतिक्षित असलेल्या ग्रामीण रुग्णालयाच्या रखडलेल्या बांधकामाला सुरुवात झाली आहे. त्या बांधकामची पाहणी साठी नागपूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीचे सदस्य सलील देशमुख यांनी ०७ जानेवारी रोजी केली. याप्रसंगी जागतिक महारींचा सामना करण्यासाठी अद्ययावत वैद्यकीय सोयी-सुविधांसह कोंढाळीचे ग्रामीण रुग्णालय सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली.

वर्ष २०१४ला या भागाचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी या भागातील नागरिकांचे आरोग्यासाठी व महामार्गवरिल गंभीर जखमींना आवश्यक मदत मिळावी या करिता येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला दर्जोन्नत करून राज्य सरकार कडून ५०खाटांचे अद्यावत सोईसुविधा युक्त ग्रामीण रूग्णालयाची मंजुरी मिळवून साडे चार कोटी चां बांधकाम निधी मंजूर करून घेतला होता.

यानंतर कोरोना सारख्या जागतिक महामारी मुळे अडीच वर्षे बांधकाम रखडले होते. अपूर्ण बांधकाम पुर्ण करण्यासाठी माजी आमदार अनिल देशमुख यांनी विधानसभेत वेळोवेळी निधीची मागणी केली होती. तेव्हा राज्य सरकारने सात कोटीचा निधी केला होता. मात्र मंजूर निधी निर्गमित करण्यात आला नव्हता. या करीता जि प सदस्य सलील देशमुख यांनी तात्कालिन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना वेळोवेळी निवेदने दिली.सध्या रखडलेल्या कामासाठी अंदाजे तीन कोटी रुपयांची मंजुरी मिळाली असून त्याचे बांधकाम मागील दोन आठवड्या पासून सुरू असल्याची माहिती जि प सदस्य सलील देशमुख यांनी दिली आहे.

बहुप्रतिक्षित असलेल्या ग्रामीण रूग्णालयाचे सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी सलील देशमुख यांनी नव निमार्णाधीन ग्रामीण रूग्णालयाची पाहणी केली.

नागपूर जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांनी कोंढाळी येथील बस स्थानकाच्या वाहन तळ, व्हेदर शेड तसेच अन्य बांधकामांची पाहणी केली. जिप सदस्य सलील देशमुख यांनी सांगितले की, तीन वर्षांपूर्वी कोटोल, नरखेड, कोंढाळी व जलालखेडा या बसस्थानकाचे वाहन तळ कोंढाळी बस स्थानकावर व्हेदर शेड व अन्य आवश्यक कामांसाठी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे सहकार्याने १७ कोटीचा निधी मंजूर झाला होता. या करिता जिप सदस्य सलील देशमुख यांनी तात्कालिन परिवहन मंत्री एसटी महामंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, यांचे कडे पाठपूरावा करून नीधी निर्गमित करण्यात आला. या नीधीतून कोंढाळी बस स्थानकाचे विकासाठी तीन कोटी मंजूरीतून सुरू असलेल्या वाहनतळाचे प्राथमिक बांधकामाची 07जानेवारीला केली. येथील बांधकाम सुरू असतांना एसटीचे वरिष्ठ बांधकाम अधिकारी कटरे बांधकाम देखरेख करत होते. याप्रसंगी मंजुरी बांधकाम प्रांकलनाप्रमाणेच करण्यात यावे अश्या सुचना ही जिप सदस्य सलील देशमुख यांनी दिल्या.

या प्रसंगी स्वप्निल व्यास, संजय राऊत, याकूब पठाण, कमलेश गुप्ता, हरिदास मडावी, नितीन ठवळे, प्रशांत खंते, आकाश गजबे, गोपाल माकोडे, रजा पठाण, प्रज्वल धोटे, तुषार राऊत, अफसर हुसेन, राहूल डोंगरे,किस्मत चौहान, परिमल हिंगणकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# कामठी शहरात बौद्ध वर वधू परिचय सम्मेलन संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
कामठी दि. ८ :

येथील आनंद बहुउद्देशीय समाज विकास संस्थे द्वारे रविवारी बौद्ध समाज वर /वधू परिचय सम्मेलन संत कबीर वाचनालय सभागृहात घेण्यात आले. या सम्मेलनात १२२ युवक युवतीनी नामांकन केले. यात नागपुर, सावनेर, रामटेक, कामठी, गोंदिया, छिंदवाडा, जबलपुर भागातील सर्व युवक युवतींनी आपापला परिचय दिला.

कार्यक्रमाचे उदघाटन प्रविण खोब्रागडे आणि तेजस संस्थेचे संस्थापक चंद्रशेखर अर्गूल्लेवार यांनी दीप प्रज्वलीत करुन केले. यावेळी सर्वश्री प्रदीपजी फुलझेले, माणिक सुर्यवंशी, विजय लांजेवार, शीवमजी धुर्वे, सूर्यभान शेड, आदींना पुष्पगुच्छ देवुन सम्मानित केले.

अनेक सामाजिक क्षेत्रात ऊत्तम कार्य करणारे यांना बौद्ध रत्न पुरस्कार देवुन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक रविंद्र तांडेकर वरील कार्य १० वषार्पासून करत आहेत.

कार्यक्रम सफलतापूर्वक पुर्वक करण्यासाठी सर्वश्री आकाश जगणीत , विजय वासनिक, शिवंम धुर्वे, विभा पाटील, विजय चौरे, सावलाताई गजभिये, संगीता फूलझेले, चेतना गोडबोले, कल्पना सुर्यवंशी, अस्मिताताई बोरकर, सुभद्राताई खोब्रागडे, सरिता शाहु, सपनाताई, वैशाली खांडेकर इत्यादी कार्यकत्यार्नी अथक प्रयत्न केले.

# शासननिर्णय व समित्यांच्या शिफारशींचे काटेकोर पालन आवश्यक : ॲड. धर्मपाल मेश्राम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

लोककल्याणकारी न्यायाच्या भूमिकेतून शासनस्तरावर घेतलेल्या शासन निर्णय व विविध समित्यांच्या शिफारसींचा प्रशासकीय पातळीवर सकारात्मक विचार झाला पाहिजे. त्यातील शिफारसींचे काटेकोर पालन होणे अपेक्षित आहे. नैसर्गिक न्याय तत्वाच्या प्रावधानातून याचा विचार करुन विविध विभागाच्या प्रशासनामार्फत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना मार्गी काढल्यास याच्या आयोगापर्यंत तक्रारी येण्याचे प्रमाण कमी होईल, असे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.

आयोगासमोर आलेल्या विविध तक्रारींची एकत्रित सुनावणी आज घेण्यात आली.

यात नागपूर येथील दाखल करण्यात आलेल्या विविध प्रकरणाबाबत बोलतांना त्यांनी शासन निर्णयावर अधिक भर दिला. लाडपागे कमिटीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी, व इतर शासकीय लाभ, कोवीडमुळे मृत्यु झाल्याने सानुग्रह अनुदान व अनुषंगिक लाभ, सेवा निवृत्तीचे सर्व लाभ, महानगर पालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व यात बाधा घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई आदी प्रकरणाबाबत ॲड. मेश्राम यांनी आज सुनावणी घेतली.

या सुनावणीस मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, उपायुक्त विजया बनकर, उपशिक्षणाधिकारी निखील भूयार, उपायुक्त विजय देशमुख, डॉ. दीपक सेलोकर आदी विभाग प्रमुख या सुनावणीस प्रत्यक्ष हजर होते. रविभवन येथे ही सुनावणी घेण्यात आली.

### भगवती गर्ल्स ज्युनिअर कॉलेजची नंदनवन पोलिस स्टेशनला भेट

**नागपूर :** पोलिस स्थापना दिनानिमित्त नंदनवन पोलिस स्टेशनला भगवती गर्ल्स ज्युनिअर कॉलेजच्या मुलींनी भेट दिली. या प्रसंगी नंदनवन पोलिस स्टेशनचे पी आय कोळी यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

तसेच पोलिस स्टेशनचा कारभार कसा चालतो .गुन्हे नोंदणी विभाग , तपासणी विभाग , दस्तावेज तपासणी विभाग, कंट्रोल रूम, कैदी विभाग, यांच्या कामाकाजा विषयी माहिती दिली.

सायबर गुन्हे व हेल्प लाईन नंबर बद्दल माहिती दिली. यात नंदनवन पोलिस स्टेशनचे रणदिवे व सर्व कर्मचारी, सहकारी मित्र यांनी सहकार्य केले या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कॉलेजच्या प्राचार्य, बोहरुपी डॉ. दीपा हटवार संजय नागेश्वर, वंदना रेवतकर यांचं सहकार्य लाभले.

# सरोजिनी पब्लीक स्कूलचे विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनीत द्वितीय

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

लाव्हा येथील महादेव नगरमधील सरोजिनी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले मसाजर मशीनच्या मॉडेलला विज्ञान प्रदर्शनीत द्वितीय स्थान मिळाले. जिल्हास्तरीय बाल कला महोत्सवांतर्गत नंदनवन येथे रविवार ५ जानेवारी रोजी आयोजित विज्ञान प्रदर्शनात सरोजिनी पब्लीक स्कूलमधील इयत्ता चौथी,सातवी, आठवी तसेच नववीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.




इयत्ता सातवीचा प्रज्वल भुसंडे याने मसाजर मशीन तयार केली होती. तसेच दीपांशू भगत या विद्यार्थ्याने मशीनचे उत्कृष्ट प्रदर्शन करून त्याचे उपयोग समजावून सांगितले.

बाल कला महोत्सवाच्या अध्यक्षा मधुरा गडकरी यांनीही या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगाचे कौतुक केले व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई वडीलासह मुख्याध्यापिका सुषमा निशाने, विज्ञान शिक्षिका प्रीती कोहळे यांना दिले. शाळेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे संचालक शिक्षक शेखर, शिक्षक प्रीती बडगे, सुरेखा बिडवाईक, युवराज राठोड, राहुल चरडे, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# विनोदातून समाजाच्या संवेदना जागवतो : किशोर बळी

## बेल्यात पत्रकार दिनानिमित्त हास्यबळी डॉट कॉम




### कर्तृतवान व्यक्तींचा सत्कार

बेला परिसरातील आरोग्य क्षेत्रातील डॉ. सूर्यकांत चावरे, धार्मिक क्षेत्रातील पिपरा येथील ह. भ. प. श्रावण कवडू समर्थ, कृषी क्षेत्रात शेतात फळझाडे लावणारे मुरादपूर येथील संतोष बाबा भगत, शैक्षणिक क्षेत्रात सुशील भानुदास मून, क्रीडा पुरस्कार बंडू सुदाम मेश्राम, कला क्षेत्रातील पुरस्कार कलावंत रमेश परसराम भोयर यांना देत सर्वांना शाल श्रीफळ व मानचिन्ह देऊन अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले. ताराबाई रीखबचंद चोरडिया यांना जीवनगौरव तर उत्कृष्ट पत्रकार म्हणून अमित नवनागे यांना सन्मानित करण्यात आले.

■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. ८ :

माणूसपण हरवत चाललेल्या समाजाच्या संवेदना जागवणे महत्वाचे असून विनोद हे त्यासाठी प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी तथा अभिनेते किशोर बळी यांनी केले.

बेला येथे पत्रकारदिनानिमित्त आयोजित हास्यबळी डॉट कॉम या भन्नाट विनोदी मनोरंजनपर कार्यक्रमात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी उमरेड विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार संजय मेश्राम होते. यावेळी मराठी पत्रकार संघाचे नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष वराडे,ठाणेदार सी.बी.चौहाण, पं. स. सदस्य पुष्कर डांगरे, सरपंच अरुण बालपांडे, दादा शेंडे,आशिष उजवणे व अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

'हास्यबळी डॉट कॉम' कार्यक्रम सादर करताना किशोर बळी यांनी वऱ्हाडी बोलीचे महत्त्व अधोरेखित करीत अवतीभवतीच्या घटनांमधून कसे विनोद घडतात, याचे दाखले देत उपस्थितांना खळखळून हसविले. नव्या पिढीच्या हातात मोबाइलऐवजी पुस्तके दिसायला हवीत, अशी रास्त अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कोनी म्हनते हिरवा अन कोनी म्हनते भगवा अरे, मानसं मरून राह्यले, पह्यले त्याईले जगवा. अशा प्रकारच्या एकापेक्षा एक सरस कविता व विनोदी किस्से सांगत त्यांनी उपस्थित श्रोत्यांना अंतर्मुख केले. आमदार संजय मेश्राम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून पत्रकार व पोलीस प्रशासनाला सत्यमेव जयते यासारखे निष्पक्ष व सत्याच्या आधारावर वागण्याचे व चालण्याचे आवाहन करून त्यांनी भविष्यातील वाटचालीसाठी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

प्रास्तविक मराठी पत्रकार संघाचे बेला शाखा अध्यक्ष सुरज कांबळे यांनी केले तर सूत्रसंचालन सचिव उत्तम पराते यांनी केले.

पत्रकार दिन समारंभाचे यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष राजू चिपडा, कोषाध्यक्ष कैलास साठवणे, सहसचिव संदीप धंदरे, नंदकुमार भुजाडे,आशिष सोनटक्के (पिपरा), दिनेश गोळघाटे, विनोदकुमार डांगरे, रवी पराते,दिलीप माथनकर, नंदकुमार भुजाडे, आशिष सोनटक्के, रोशन मेहरकुरे, दिलीप घीमे, राजेंद्र सूर्यवंशी, संजय लामपुसे, तुषार मुठाळ, पुंडलिक कामडी, खुशाल वैद्य, अखिल रोडे व सर्व सदस्य पत्रकारांनी परिश्रम घेतले.

# वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. ८ :

आर. एस. मुंडले इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता ५ ते ७ साठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. "सकारात्मक विचार करण्याची शक्ती" हा विषय आणि८ ते १० साठी वादविवाद स्पधेर्चा विषय होता " तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना हुशार किंवा परावलंबी बनवते." तृषा राऊत, स्नेहल घारपुरे आणि अमृता नगरकर व सोनाली भागवत यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली.

वाल्मिकींचे उदाहरण देत मुलांनी भविष्यात सकारात्मक दृष्टिकोन ठेवत आयुष्यात घडणारे बदल यावर चर्चा केली. वादविवाद स्पर्धेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये होणारे सकारात्मक बदल व त्याचबरोबर अकचा वापर, चाणक्यचे उदाहरण देत विद्यार्थ्यांनी भविष्यात अपेक्षित असणारे तंत्रज्ञानातील बदल व त्याचा उपयोग याविषयी संवाद साधला.

वक्तृत्व स्पधेर्तून प्रथम क्रमांक श्रीपाद टोपरे (ॲपल गट), द्वितीय क्रमांक अन्वी हिरडे (रोहिणी गट), उत्तेजनार्थ समृद्धी नितनवरे (आर्यभट गट) यांनी मिळवली. वादविवाद स्पर्धेच्या विषयाने मुलांना हे सांगितले की आपण आपल्या आयुष्यात फार बारीक सारीक गोष्टीतही नवीन नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करत असतो,
वादविवाद स्पधेर्तून प्रथम क्रमांक सिया साधू (रोहिणी गट), द्वितीय क्रमांक स्वराली ठेकेदार (ॲपल गट), उत्तेजनार्थ १.सृष्टी रेवतकर (?पल गट), २.आल्हाद मुन्शी (आर्यभट गट), ३.शरण्या जांभुळकर (रोहिणी गट) यांनी मिळवले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डॉ. पद्माकर चारमोडे, पर्यवेक्षिका सुरी , स्पर्धा प्रमुख प्रीती लांबे यांची उपस्थिती होती.

स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकांनी उत्साहाने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांची भाषेची प्रगल्भता वाढवण्यास मदत मिळते आणि विद्यार्थी आत्मविश्वासाने आपले विचार मांडू शकतात.

### नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी एक्सप्रेस रद्द

**नागपूर:** नागपूर-छिंदवाडा मार्गावरील रेल्वे पुलाशी संबंधित काम सुरू असून, त्यामुळे दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातील भीमलगोंडी-भंडारकुंड रेल्वे सेक्शनवरील रेल्वे वाहतूक सध्या बंद आहे. या रेल्वे विभागावरील पुलाचे काम सुरू आहे.

वरील विभागावर सुरू असलेल्या बांधकामामुळे, या रेल्वे मार्गावर पुढील ट्रेन क्र. 11756 रीवा-नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी एक्स्प्रेस 30 मार्च'25 पर्यंत आणि ट्रेन क्र. 11756 31 मार्च'25 पर्यंत चालविली जाईल.

11755 नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रीवा एक्स्प्रेस रद्द राहील, म्हणजेच या गाड्यांचे संचालन वरील दिवशीही रद्दच राहील. याशिवाय 31-03-2025 पर्यंत नागपूरहून सुटणारी ट्रेन क्र. 11201.एक्सप्रेस ट्रेन नागपूर-आमला-छिंदवाडा मार्गे आणि शहडोल येथून ०१-०४-२०२५ पर्यंत सुटणार क्र. 11202 शहडोल-नागपूर छिंदवाडा-आमला-नागपूर मार्गावरच ट्रेनचे संचालन सुरू आहे.

# कळमेश्वरला नागपूरची सॅटेलाइट सिटी म्हणून पुढे आणू : आ.डॉ. आशिष देशमुख

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ८ :

"माझी काटोल येथून लढण्याची इच्छा होती. डॉ. राजीव पोतदार, मनोहर कुंभारे, प्रकाश टेकाडे आणि इतर तोलामोलाचे भाजपा नेते सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्रात आहेत. यापैकी कोणालातरी इथून उमेदवारी मिळेल, असे मला वाटत होते. पण मला सुद्धा आश्चर्याचा धक्का बसला जेव्हा शेवटच्या दिवशी देवेंद्रजी फडणवीस, नितीन गडकरी व चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी मला सावनेर-कळमेश्वर क्षेत्रातून निवडणूक लढण्याचे निर्देश दिले. त्यानंतर प्रत्येक नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी प्रचाराची धुरा समर्थपणे उचलून पंधरा दिवसांच्या प्रचारात मला इथून भरघोस मतांनी निवडून दिले. त्यासाठी मी सर्वांचे आणि इथल्या जनतेचे हात जोडून आभार व्यक्त करतो.




या आधी या क्षेत्रामध्ये दबावाचं, चुरशीचं, हेव्यादाव्याचं, अवैध धंद्याचं, गुंडागर्दीचं राजकारण होतं. हे यापुढे चालणार नाही. येणाऱ्या काळात इमाने इतबारे, प्रेमाने, जिव्हाळ्याने, आपुलकीने आपण एक मुलगा म्हणून, एक भाऊ म्हणून जनतेची सेवा करू. पदाची मला लालसा नाही. सर्वांना माहित आहे की, मी आमदारकीचा सुद्धा जनतेच्या हितासाठी त्याग केला होता. तरुणांसाठी विकासाची दालने उघडून सामाजिक कामे राजकारणात असताना आपण चांगल्या प्रकारे आणि जलदगतीने करू शकतो, म्हणून मी विकासासाठी आणि जनतेच्या सेवेसाठी राजकारणात आहे. आमचं देशमुख कुटुंब हे पिढ्यानपिढ्या कळमेश्वर येथील रहिवासी आहे. आमचे आजोबा इथे शिकण्यासाठी होते. त्यामुळे मी कळमेश्वरचा पुत्र आहे. कळमेश्वरच्या विकासासाठी नव्या योजना आखण्यात आल्या असून त्या आपण पूर्ण करू, कळमेश्वरला नागपूरचे सॅटेलाइट सिटी म्हणून आपण पुढे आणू. नागपूर-कळमेश्वर रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण होत आहे.

येणाऱ्या पाच सहा महिन्यात हे काम आम्ही पूर्ण करू. नागपूरपासून दहा-पंधरा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या कळमेश्वरचा नागपूरचे सॅटेलाइट सिटी म्हणून आपण तत्परतेने विकास करू. आपल्या येथे गार्डन, मटन मार्केट, भाजी मार्केट, स्टेडियम असायला पाहिजे आणि त्यादृष्टीने आपण कसोशीने काम करू. आपल्या येथे सिनेमागृह व नाट्यगृह असले पाहिजे. देवेंद्रजी फडणवीस हे आपले मुख्यमंत्री आहेत. आम्ही आपल्या मागण्या पूर्ण करू. रस्ते, फ्लायओवर यासाठी श्री गडकरी साहेबांचे काम आपण मागील दहा वर्षात बघितले आहे. आपल्या इथल्या कामांसाठी आपण त्यांची मदत घेणार आहोत. कळमेश्वर शहर हे आर्थिक चलनाचे केंद्र बनावे, इथे एमआयडीसीचा विस्तार व्हावा, नवे उद्योग कळमेश्वर येथे यावेत म्हणून इथे मी व्यक्तिशः प्रयत्न करणार आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने कळमेश्वर तालुका हा महत्त्वाचा आहे. झालेल्या फळगळीसाठी साडेबारा कोटी रुपये संत्रा व मोसंबी उत्पादकांसाठी मंजूर केले आहेत.

ते लवकरच कास्तकारांचे खात्यात जमा होतील. संत्रा व मोसंबीचे उत्पादन वाढावं म्हणून 25-30 कोटी रुपयांची कृषी विभागाची सिट्रस इस्टेट तिडंगी किंवा सवंद्री येथे निर्माण करणार, ज्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळेल. शेतकऱ्यांना हार्वेस्टिंग सारख्या विषयांवर मदत करणार. कळमना एपीएमसी येथे संत्रा, मोसंबी वर काटपद्धती होती. एका टनामागे शंभर किलोचा काट आपण 15 दिवसांपूर्वी बंद केला. यावेळी डॉ. आयुश्री देशमुख, डॉ. राजीव पोतदार, मनोहर कुंभारे, लीलाताई तायवाडे, दिलिप धोटे, संदीप उपाध्ये, घनश्याम देवके, सरिताताई नासरे, भाजपा नेते, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# आदर्श एच.एस.सी. व्होकेशनल ज्युनिअर कॉलेजमध्ये फुले जयंती



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

दवलामेटी येथील आदर्श एच.एस.सी. व्होकेशनल ज्युनिअर कॉलेजमध्ये स्त्री शिक्षणाची शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.शारदा कोरे होत्या. तर प्रमुख पाहुणे प्रा.नंदकिशोर भोयर, प्रा. गजानन काकड, प्रा. अविनाश बारब्दे, विलास मुसळे, राजू शेळके उपस्थीत होते. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन माल्यार्पण व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रा. नंदकिशोर भोयर व काही विद्यार्थ्यांनी सावीत्रीबाई फुले यांच्या जिवनावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक प्रा. गजानन काकड यांनी केले. अध्यक्षीय भाषण प्रा. शारदा कोरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन रुकसान मंसूरी हिने तर आभार नंदिनी येडेकर या विद्यार्थ्यांनी मानले.

# पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाची आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडून पाहणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मंगळवारी (ता. ७) पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा अंतर्गत सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. पाहणी दौऱ्यात अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता श्री. राजेश दुफारे, नेहरू नगर झोनचे कार्यकारी अभियंता नरेश शिंगनजुडे, हनुमान नगर झोनचे कार्यकारी अभियंता मनोज सिंग, प्रकल्पाचे सल्लागार डीआरए कन्सल्टन्टचे आदित्य राठी उपस्थित होते.



पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पामध्ये अमृत-२ अंतर्गत शासनामार्फत मंजुरी प्राप्त प्रकल्पांचे काम मनपाद्वारे सुरु आहेत. या प्रकल्पांची आयुक्तांनी पाहणी केली. त्यांनी नेहरू नगर झोन मधील श्यामबाग भविष्य निर्वाह निधी कार्यालयाजवळील वस्ती परिसरातील नवीन सिवर लाईन बदलवणे, हनुमान नगर झोनमधील शिवाजी नगर बेसा पॉवर हाऊस मागील भागातील नवीन सिवर लाईन बदलवणे आणि नरसाळा गारगोटी भागात नवीन सिवर लाईन टाकण्याच्या कामाचे निरीक्षण केले. श्यामबाग व शिवाजी नगर बेसा पॉवर हाऊस मागील भागातील सिवर लाईनचे काम पी. दास इन्फ्रास्ट्रक्चर द्वारे करण्यात येणार आहे.

नागरिकांकडून प्राप्त तक्रारींची दखल घेऊन या भागांमध्ये सिवर लाईनचे काम केले जात आहे. परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या पुढील अनेक वर्षांच्या सुविधेसाठी सर्व भागातील सिवर लाईन बदलावण्याचे काम प्राधान्याने करण्याचे निर्देश मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

सिवर लाईन बदलावण्याचे काम झाल्यानंतर रस्त्याचे योग्य पुनर्भरण व्यवस्थित व त्वरित करणे तसेच कुठेही बांधकाम साहित्य, मलबा राहू नये याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश देताना त्यांनी कारवाईचा देखील इशारा दिला. शिवाजी नगर बेसा पॉवर हाऊस मागील भागामध्ये अनेक घरांनी सिवर लाईनवर देखील अनधिकृत बांधकाम केल्याची माहिती विभागाद्वारे देण्यात आली. या भागातील नागरिकांना दीर्घकाळ सुविधा मिळावी यासाठी अनधिकृत बांधकाम तोडण्याचे निर्देश डॉ. चौधरी यांनी दिले.

नरसाळा गारगोटी भागामध्ये लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसद्वारे नवीन सिवर लाईन टाकण्याचे काम केले जात आहे. या भागात प्रिकास्ट चेम्बर बसविले जात आहे. प्रिकास्ट चेम्बरमुळे जलद गतीने उत्तम दर्जाचे काम पूर्ण होणार असल्याची माहिती यावेळी आयुक्तांना देण्यात आली. प्रिकास्ट चेम्बरच्या दर्जामध्ये कोणतीही कसूर न करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

यावेळी मनपा उपअभियंता रवी मांगे, प्रशांत वाघमारे, माजी नगरसेवक नागेश सहारे, पी. दास इन्फ्रास्ट्रक्चरचे अवकाश पटेल आणि लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसचे मनीष शाह उपस्थित होते.

## पोलिस कोठडीत आत्महत्येचा प्रयत्न

### चोराने स्वतःच्याच पोटात भोसकला चाकू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

जरीपटका ठाण्यात नोंद चोरीच्या एका प्रकरणात गुन्हे शाखा युनिट 5च्या पथकाने एका सराईत चोराला अटक केली होती. पुढील कार्यवाहीसाठी त्याला जरीपटका पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. चोरीबाबत चौकशी सुरू असतानाच आरोपीने पोलिसांच्या टेबलाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेला चाकू काढला आणि स्वतःच्या पोटात भोसकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या प्रकाराने जरीपटका ठाण्यात खळबळ उडाली. तत्काळ त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. प्रज्वल विशाल शेंडे (22) रा. कस्तूरबानगर, जरीपटका असे आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.

प्रज्वल हा सराईत चोर आहे. त्याच्यावर घरफोडी व वाहन चोरीचे 28 हून अधिक गुन्हे दाखल आहेत. त्याला यापूर्वीही काही गुन्ह्यात अटक झाली होती. सोमवारी रात्री प्रज्वल हा जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करण्याच्या तयारीत होता. मात्र, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल शिरे यांच्या पथकाच्या हद्दीस पडला. पोलिसांना पाहून तो पळायला लागला. पोलिसांनी त्याला शिताफीने सापळा रचून ताब्यात घेतले. त्याला चांगला चोप दिल्यानंतर रात्रीच्या सुमारास जरीपटका पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिले. जरीपटका पोलिसांनी त्याला रात्रभर पोलिस कोठडीत ठेवले. मंगळवारी सकाळी 11.30 वाजता त्याला चौकशी करण्यासाठी कोठडीतून बाहेर काढले. तपास पथकाच्या खोलीत (डीबी) त्याला ठेवण्यात आले होते. त्याला बाजीराव पट्ट्याने प्रसादही देण्यात आला. चिडलेल्या प्रज्वल एका कोपऱ्यात शांतपणे बसला. दरम्यान डीबी पथकाचे लक्ष विचलित होताच त्याने बाजूलाच असलेल्या टेबलच्या ड्राव्हरमधून चाकू काढला आणि पॅन्टच्या खिशात लपवला. काही वेळाने आणखी दोन पोलिस कर्मचारी तेथे आले. त्यांनी प्रज्वलला घरफोडीतील मुद्देमालाविषयी विचारणा केली. काही वेळातच प्रज्वलने चाकू काढला आणि स्वतःच्या पोटात भोसकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने पोलिसांना चांगलाच घाम फुटला. तत्काळ वरिष्ठांना घटनेची माहिती देण्यात आली. रक्तबंबाळ अवस्थेत प्रज्वलला मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# 'संवेदना' आणि 'गायत्री' बालिकाश्रम जिव्हाळा २०२५ पुरस्काराचे मानकरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

'स्वर्गीय विलास फडणवीस यांच्या जयंतीनिमित्त दिला जाणारा जिव्हाळा पुरस्कार यावर्षी नागपूरच्या,' संवेदना' स्कूल फॉर न्यूरोडायव्हर्स आणि अकोल्याच्या 'गायत्री' बालिकाश्रम या दोन संस्थांना देण्यात येणार आहे.



10 जानेवारी 2025 ला हा पुरस्कार सोहळा संध्याकाळी सहा वाजता धरमपेठ महिला को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या पाचव्या मजल्यावर सिताराम भवन येथे होणार आहे. हा पुरस्कार सोहळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे.

यावेळी अमृतवक्ता विवेक घळसासी हे त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. तर विशेष अतिथी धरमपेठ महिला को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष नीलिमा बावणे आणि अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याच्या आवाहन अविनाश संगवई, नागेश पाटील यांनी पत्र परिषदेत केले.

## तरुणाला ३.४७ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

वस्तीत राहणाऱ्या युवतीची मदत करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले. युवतीने विश्वासघात करून तरुणाला 3.47 लाख रुपयांचा गंडा घातला. इतकेच नाहीतर पैसे परत मागितले असता साथीदारांच्या मदतीने जिवे मारण्याची धमकी दिली.

ही घटना तहसील पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी कौस्तूभ केशव कुबडे (27) रा. जागनाथ बुधवारीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. शिवानी दिलीप खापेकर (24) रा. भारत माता चौक, मेहुल विजय पराते (24) रा. जागनाथ बुधवारी आणि प्रतिकसिंग गजेंद्रसिंग सोळंकी (24) रा. अयोध्यानगर अशी आरोपींची नावे आहेत. कौस्तूभ आणि शिवानी एकाच वस्तीत राहतात. त्यामुळे दोघेही एकमेकांना ओळखत होते. नोव्हेंबर 2023मध्ये शिवानीने कौस्तूभला तिच्यावर खूप कर्ज असून देणेदार तिला त्रास देत असल्याचे सांगितले. कौस्तूभला विश्वासात घेऊन शिवानीने कर्जाची परतफेड करण्यासाठी त्याला बँकेतून कर्ज घेण्यासाठी तयार केले. मदत करण्याच्या उद्देशातून कौस्तूभने 3.47 लाखांचे कर्ज घेत रक्कम शिवानीला दिली. शिवानीने काही दिवसात पैसे परत करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र बरेच दिवस लोटूनही ती पैसे परत करीत नव्हती. प्रत्येक वेळी नव-नवीन बहाणे करून वेळ मारून नेत होती. कौस्तूभने पैसे परत करण्यासाठी दबाव टाकला असता शिवानीने मेहुल आणि प्रतिकसोबत मिळून त्याला शिविगाळ केली.

# ३० जाने. ते १२ फेब्रुवारीला अतिरूद्र महायज्ञाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

महाराष्ट्र आर्य वैश्य समाज, नागपुर व शब्दकृती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यामाने नागपुर नगरीत अतिरूद्र महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या यज्ञाचा उद्देश मानव समृद्धी व वैश्विक शांती आहे. वानाडोंगरी स्थीत सत्यसाई ग्रामीण सेवा केन्द्र, वसंत विहार, येथे हा यज्ञ ३० जाने. ते १२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत राहील. १२ फरवरीला दुपारी १२.३० वा यज्ञाची पूणार्हूति सम्पन्न होईल. या निमित्त सामाजिक व आध्यात्मिक तसेच राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर यज्ञस्थानी भेट देतील.

या यज्ञात पौरोहित्य करण्यासाठी आंध्रप्रदेश, कर्नाटक व वाराणसी येथून पूरोहित येतील, एकुण १५० पूरोहीतांच्या मार्गदर्शना खाली हा यज्ञ सम्पन्न होईल. या निमित्त ११ यज्ञ कुंडावर ४४ यजमान रोज सम्मिलित होतील. ११ दिवस हा यज्ञ चालेल ज्यात ४८४ यजमान सम्मिलित होतील व १४६४१ रूद्रांचा पाठ व दशांश हवन होईल.

विविध विषयांवर किर्तन, प्रवचनांच्या द्वारे समाज प्रबोधन केले जाईल. दुपारी १२.३० ते २ व रात्री ८ ते १० महाप्रसादाची व्यवस्था राहील. या पवित्र कार्यात समाजातील विविध घटकांनी सहभागी व्हावे व पुण्य लाभ प्राप्त करावा हि विनंती. ज्या भक्तांना यज्ञात सहभावी व्हावयाचे आहे त्यांनी संबधित क्रमांकावर संपर्क करावा.

समिती तर्फे अशी विनंती सर्वश्री गणेश चक्करवार, राजु मुक्कावार, मनोज गोलावार, अजय निंल्डावार, गिरीराज चौहान, नरेन्द्र ढवळे, नितिन मुकेवार, अतुल गोलवार, विनोद भाकरे, कुणाल गोलावार, परिणीती माथुरकर, प्रितेश माथुरकर, आदित्य पवार, तृषाली माथुरकर यांनी केली आहे.

## सत्कार समारोहाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

हिंदी ही एक सोपी आणि वैज्ञानिकदृष्ट्या सुंदर भाषा आहे. आज आपण पाहतो की ती संपूर्ण भारतातील संपर्क भाषा आहे. 10 जानेवारी 1975 रोजी नामपूर शहरात जागतिक हिंदी दिन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि 2006 मध्ये भारत सरकारने तो जागतिक स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला.

या निमित्ताने अखिल भारतीय हिंदीसाठी कार्य करणाऱ्या त्या महान मराठी भाषिकांना कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

संस्था असोसिएशन, नवी दिल्ली आणि विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूर यांच्या वतीने झापानसाठी काही मान्यवरांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मा. आशा पांडे, डॉ.अक्षयकुमार काळे, मॅडॉन, हेमचंद्र वैद्य, डॉ.कविता शनवरे, डॉ.वीणा दळे, डॉ.लीना रस्तोगी, भारती सुदाम, माधुरी राऊळकर, भगवान वैद्य, प्रखर, इंदिरा हटवार, मिस्टर अशोक डोळस, वसुधा पाडी, माँ, प्राचार्या नंदिनी जठार चान यांनी मान्यवरांचा सत्कार, मेहनती हिंदी साहित्यिक व नागपूर शहराचे माजी पोलीस आयुक्त डॉ. भूषणकुमारजी उपाध्याय यांच्याशी संपर्क साधला जाणार आहे.

या दिमाखदार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ भैरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष मदौन निरिशजी गांधी आणि अखिल भारतीय हिंदी संस्था संघटनेचे अध्यक्ष अज; पाटील विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

हा सत्कार सोहळा शुक्रवार, 10 जानेवारी 2025 रोजी दुपारी 1.30 वाजता विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, उत्कर्ष हॉल, हिंदी गोरभवन, सीताबल्डी, नागपूर येथे होणार आहे.

# सुरक्षा कर्मचाऱ्यावर अज्ञात हल्लेखोरांचा हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ८

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत एकिकृत इंदर कामठी डीप ओपन कास्ट माईन परिसरात सुरक्षा कर्मचाऱ्यावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वाहन पेटवुन पळुन गेले

पोलीसांन कडुन मिळालेल्या माहिती नुसार मंगळवार (दि.७) जानेवारी ला रात्री ८ वाजताच्या दरम्यान एम एस एफ सुरक्षा कर्मचारी प्रशांत सुधाकर सोनारे, प्रवीण ठाकरे, विलास मापारी आणि वाहनचालक आशीष मेश्राम हे महिंद्रा बोलेरो कॅम्पर चार चाकी वाहन क्रमांक एम एच ४० सी एम ३३३९ या वाहनाने दोन १२ बोअर रायफल आणि २० राउंडसह कोल माईन परिसरात पेट्रोलिंग करीत होते.

यावेळी आर.के.वर्कशॉप जवळ वाहनाला एका अनोळखी व्यक्तीने वाहन थांबवण्याचा इशारा केला.




वाहन चालकाने वाहन थांबविले असता तो व्यक्ति वाहनाचा जवळ आला. तेवढ्यात प्रशांत सोनारे यांचा साईडने दोन इसम हातात तलवारी घेऊन मातीचे ढिगाऱ्याहुन कुदले. एक हल्लाखोर सुरक्षा कर्मचाऱ्यांची दिशा भुल करुन कोणतीही कल्पना न देता वाहनाची चावी काढुन पळुन गेला. दोन हल्लेखोरांनी सुरक्षा कर्मचारी यांना जीवे मारण्याचा उद्देशाने वार केला. वार चुकवुन ड्राइवर आशिष मेश्राम आणि सुरक्षा कर्मी विलास मापारी वर्कशॉप कडे पळाले, प्रशांत सोनारे आणि प्रवीण ठाकरे वाहनाच्या मागील बाजुने पळुन गेले. हल्लेखोरांनी त्यांचा तलवार घेऊन पाठलाग केला. सुरक्षा कर्मचारी यांनी दुर पर्यंत जाऊन मागे पाहणी केली असता एका हल्लेखोराने वाहना जवळ थांबून त्याला आग लावली. सुरक्षा कर्मचारी यांनी वाहनाच्या जवळ येऊन पाहणी केली असता मोबाइल, रायफल आणि गोळ्या आगीत जळुन खाक झाले. सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी संपुर्ण स्टाफसह घटनास्थळी तातडीने धाव घेतली. सदर घटना गांभीर्याने घेत नागपुर ग्रामीणचे अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पोलीसांना मार्गदर्शन करुन योग्य कारवाईचे निर्देश दिले.

या घटनेने खदान माईन परिसर हादरुन गेले असुन सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. एमएसएफ सुरक्षा कर्मचारी सुरक्षिततेबाबत गंभीर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणी एम एस एफ सुरक्षा कर्मचारी प्रशांत सोनारे यांचा तक्रारी वरून कन्हान पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक १७/२०२५ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम १०९ , १३२ , ३२६ (एफ) आणि ३(५) बीएनएसगुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धुक्यामुळे अनेक रेल्वेगाड्यांना विलंब

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

उत्तर भारतात थंडीसोबतच आता धुक्यामुळे अनेक रेल्वे गाड्या विलंबाने धावत आहे. यात प्रामुख्याने केरला एक्सप्रेस १० तास ५० मिनिट उशिरा आल्याने गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय गाडी क्रमांक १२२७० चेन्नई दुरांतो एक्सप्रेस ९ तास ५४ मिनिट, गाडी क्रमांक २०८०६ आंध्र प्रदेश एक्सप्रेस ९ तास ३६ मिनिट मध्यवर्ती स्थानकावर उशिरा आल्याने प्रवाशांना ताटकळत राहावे लागले.

धुक्यामुळे भारतीय रेल्वेच्या कामकाजावरही परिणाम झाला असून काही गाड्या रेल्वेने रद्द केल्या आहेत. धुक्यामुळे खबरदारीचा भारतीय रेल्वेने उत्तर भारतातील गाड्या रद्द केल्या आहेत. उशिरा धावत गाड्यांमध्ये प्रामुख्याने गाडी क्रमांक १२६२६ केरला एक्सप्रेस १० तास ५० मिनिट, गाडी क्रमांक १२२७० चेन्नई दुरांतो एक्सप्रेस ९ तास ५४ मिनिट, गाडी क्रमांक २०८०६ आंध्र प्रदेश एक्सप्रेस ९ तास ३६ मिनिट, गाडी क्रमांक १२७२३ तेलंगणा एक्सप्रेस ३ तास ४२ मिनिट, गाडी क्रमांक १२६१६ जीटी एक्सप्रेस ८ तास ५९ मिनिट, क्रमांक १८०३० मुंबई एलटीटी एक्सप्रेस ३ तास ५७ मिनिट, गाडी क्रमांक २०८२२ पुणे हमसफर एक्सप्रेस ६ तास १मिनिट, गाडी क्रमांक १२१३० आझाद हिंद एक्सप्रेस १ तास ५५ मिनिट, गाडी क्रमांक १२६२२ तामिलनाडू एक्सप्रेस ४ तास ४१ मिनिट, गाडी क्रमांक १२९०६ पोरबंदर सुपर एक्सप्रेस १ तास १५ मिनिट, गाडी क्रमांक निझामउददीन एक्सप्रेस ३७ मिनिट, गाडी क्रमांक १२७२४ तेलंगणा एक्सप्रेस ८ तास ३४ मिनिट, गाडी क्रमांक १२४१० राजगड गोंडवाणा एक्सप्रेस ७ तास ५४ मिनिट उशिरा रेल्वेस्थानकावर आली असल्याची माहिती रेल्वेकडून देण्यात आली.

# खो-खो व ॲथलेटिक्स स्पर्धेला १२ जानेवारीपासून सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ८ :

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सातव्या खासदार क्रीडा महोत्सवांतर्गत रविवारी १२ जानेवारी २०२५ रोजी मॅरेथॉन व युवा दौडचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (१२ जानेवारी) सकाळी ५ वाजता यशवंत स्टेडियम येथून मॅरेथॉन आणि सकाळी ६.३० वाजता युवा दौडला सुरूवात होणार आहे. याशिवाय विदर्भ स्तरीय खो-खो आणि ॲथलेटिक्स स्पर्धेला सुद्धा रविवारी १२ जानेवा रोजी सुरुवात होणार आहे.

मॅरेथॉनमध्ये प्रवेशासाठी अंतिम तारीख १० जानेवारी असून या निर्धारित तारखेपूर्वी स्पर्धकांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक माजी महापौर संदीप जोशी यांनी केले आहे.

१२ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत मॅरेथॉन आणि युवा दौडने महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. पुरूष, महिला आणि १६ वर्षाखालील मुले व मुली या गटामध्ये मॅरेथॉन तर ३ किमी अंतराची युवा दौड सर्वांसाठी खुली असणार आहे. दोन्ही स्पर्धांसाठी प्रत्येकी ५० रुपये प्रवेश शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. युवा दौडमध्ये सहभागी प्रत्येक स्पर्धकाला मेडल्स, प्रमाणपत्र आणि टी-शर्ट प्रदान करण्यात येईल.

मॅरेथॉनमध्ये पुरूषांसाठी १० किमी, महिलांसाठी ५ किमी, १६ वर्षाखालील मुलांसाठी ५ किमी आणि १६ वर्षाखालील मुलींसाठी ३ किमी अंतर निर्धारित करण्यात आले आहे. चारही गटातील विजेत्यांना एकूण ३ लाख २८ हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक श्री. सचिन देशमुख (9766893380) व समन्वयक पारेंद्र पटले (9823531899) आणि शिवाणी दाणी (9860133860) यांच्याशी संपर्क साधावा. रविवारी १२ जानेवारी रोजी मानकापूर स्टेडियममध्ये विदर्भ स्तरीय खो-खो स्पर्धेला सुरूवात होईल. सीनिअर पुरुष, महिला आणि १४ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ३ लाख ६८ हजार रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक डॉ. पद्माकर चारमोडे (9823659655) आणि समन्वयक विनोद बघेल (9423405320) यांच्याशी संपर्क साधावा. रविवारपासूनच मानकापूर क्रीडा संकुलातील सिंथेटिक ट्रॅकवर ॲथलेटिक्स स्पर्धेला सुद्धा सुरुवात होणार आहे. खुला पुरुष व महिला गट तसेच १२ वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील, १८ वर्षाखालील मुले व मुली आणि ३५ वर्ष वयोगटावरील गटामध्ये ही स्पर्धा होईल. स्पर्धेतील विजेत्यांना ७ लाख ९५ हजार ९०० रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक अशफाक शेख (9422127843) आणि समन्वयक अमर खोडे (9850644584) यांच्याशी संपर्क साधावा.

## लग्नघरी चोरांचा डल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

लग्नघराचे कुलूप तोडून चोरांनी दागिन्यांसह 1 लाख 3 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत महात्मा गांधीनगरात घडली. पोलिसांनी सुरेश शंकर सरोदे (63) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. सुरेश यांचा मुलगा आनंद याचा लग्न समारंभ कळमना परिसरातील नैवेद्यम सभागृहात आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण कुटुंब कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गेले होते. या दरम्यान चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून एक लाख रुपये किंमतीचे दागिने चोरी केले. लग्न समारंभ आटोपून घरी परतल्यावर ही घटना उघडकीस आली. पोलिसात तक्रार करण्यात आली. अशाच प्रकारची एक घटना गत महिन्यात मानेवाडा-बेसा मार्गावर घडली होती. चोरांनी घरफोडी करून 16.70 लाख रुपयांचा माल चोरून नेला होता. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# चर्मकार समाजाचा वधू-वर परिचय मेळावा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८

श्री संत रविदास महाराज मित्र परिवाराच्या वतीने नागपूर येथील श्री संत रविदास सांस्कृतिक सभागृह हनुमान नगर येथे वधु -वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. जीवन यापनाच्या व्यस्ततेत विवाह योग्य युवक युवती करिता नातेसंबंध जुळविण्याचे काम हल्ली विवाह संस्था मार्फत होऊ लागलेले आहे.

परंतु विवाह संस्थेमार्फत होणारे नातेसंबंध टिकाऊ दिसत नाही अशी परिस्थिती समाजात आढळून आल्यामुळे श्री संत रविदास महाराज मित्र परिवार च्यावतीने नवदांपत्याच्या उज्वल भविष्यासाठी, समाज बांधवांच्या उपस्थितीत वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करून सामाजिक ऋण फेडण्याचा एक प्रयत्न करण्यात आला. वधू-वर परिचय मेळाव्याच्या या आयोजनाला उद्घाटक म्हणून केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. नितीन गडकरी यांनी द्वीप पज्वलन करून मेळाव्याचे उद्घाटन केले. चर्मकार समाजाच्या परिचय मेळाव्यात 300 च्या वर युवक युवतींनी भाग घेऊन स्वतःचा परिचय दिला.

यावेळी युवक युवतींच्या परिवारा सोबतच कार्यक्रमात सात आठशे लोकांनीं सहभाग घेतला. संत रविदास महाराज युवा मित्र परीवार कडून आयोजित करण्यात आलेल्या चर्मकार समाजाच्या भव्य वर-वधू परिचय मेळाव्याला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार कृपाल तुमाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच सामाजिक संस्थेद्वारे अशा पद्धतीचे आयोजन वारंवार करण्यात यावे आणि सामूहिक विवाह सोहळे पार पडावे याकरिता त्यांनी सक्करदरा येथील बुधवार बाजार या ठिकाणावर भविष्यात दहा हजार लोकांची व्यवस्था होणार अशा पद्धतीचे समाज भवन बांधून देण्याची उपस्थितांना ग्वाही दिली.

तर कार्यक्रमाची सांगता राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चर्मकार समाजातील युवक युवतींना आशीर्वाद देऊन केली. श्री संत रविदास महाराज मित्र परिवारा च्यावतीने हनुमान नगर येथील वधु - वर मेळाव्याच्या आयोजनला प्रामुख्याने केन्द्रीयमंत्री नितिन गड़करी, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने, आयोजक हितेश मुंदाफळे मंचावर उपस्थित होते. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करणारे प्रामुख्याने उपस्थित संदीप वासनकर, नरेन्द्र मालखेडे, पवन मालखेडे, स्नेहल वासनकर, प्रिया मुंदाफळे, अश्विनी मालखेडे, रूपाली मालखेडे, अनिकेत आग्रे सह मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते.